'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
Vol. 1 Issue. 1
ISSN : 2348-7143 (Online)
Jan-March - 2014

# ब-बळीचा : शेतकऱ्यांची हृदयद्रावक कथा

- प्रा. प्रकाश कारभारी शेवाळे
सहाय्यक प्राध्यापक[मराठी विभाग]
म. गांधी विद्यामंदिर संचलित
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय हरसुल

*खेडयातील अमूलाग्र बदलामुळे जागतिकीकरणाचे नवे वारे ग्रामीण भागात वाहू लागले व शहरीकरणाचे सर्व लोकांना वेध लागलेत पण त्यांच्या दुष्परीणामांशी कुणाला काही घेणे-देणे नाही. त्यामुळेच पारंपरिक संस्कृतीला छेद देत खेडेगावातही विकृती निर्माण होऊ लागली आहे याची सुस्पष्ट जाणीव तसेच सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक, औद्योगिक आणि शहरीकरणाचा ग्रामीण संस्कृतीवरचा परीणामांचा भलामोठा आलेख म्हणजेच डॉ. गवस यांची कादंबरी 'ब-बळीचा'.*

८० च्या दशकातले एक महत्वाचे ग्रामीण लेखक म्हणजे डॉ. राजन गवस होत. डॉ. राजन गवस हे मूळचे गडहिंग्लजचे पण गारगोटी या गावी असणाऱ्या मौनी विद्यापीठात मराठी विभागप्रमुखाची जबाबदारी ते सांभाळत आहेत. कथा, कादंबरी, ललितगदय व कविता हे चारही साहित्यप्रकार डॉ. गवस यांनी हाताळून ग्रामीण जीवनाचं वास्तव चित्रण रेखाटण्याचे काम केले आहे. डॉ. गवस यांच्या कसदार लेखनाने खरे ग्रामीणत्व काय आहे? शेतकऱ्याच्या जीवनात जागतिकीकरणामुळे काय फरक पडला? ही सगळी प्रश्न निर्माण करून या कृषी- संस्कृतीतला खरा बळी कोण हे दाखवण्याचा प्रभावी प्रयत्न डॉ. गवस यांनी 'ब-बळीचा' या ग्रामीण कादंबरीत केला आहे.

नुकतीच पॉप्युलर प्रकाशनाने ही कादंबरी प्रकाशित केली असून नाशिक जिल्हयातील चांदवडचा एक कलंदर चित्रकार विष्णू थोरे यांच्या मुखपृष्ठाने या कांदबरीतील कथानकाला एक वेगळे परीमाण लाभले आहे. शेतकऱ्याच्या जीवनातील एक हृदयद्रावक कथा या कादंबरीत आली आहे. नागरीकरणाने या खेडयांना काय दिले असेल तर फायदे कमी आणि तोटेच जास्त दिले आहेत. भारताचे खरे अर्थकारण हे कृषीसंस्कृतीतून चालते. पण या शेतकऱ्यांना टर्मिनेटर बियाणे, सेंद्रिय व रासायनिक खते, शेतीची आधुनिक औजारे तसेच वाढलेल्या उत्पादन खर्चाने पांगळे करून टाकले आहे.

शेतीत यांत्रिकीकरण आले आणि त्याचा फायदा होण्याऐवजी तोटाच कसा झाला याचे प्रत्यंतर 'ब-बळीचा' कादंबरी वाचतांना आपणास येते. कथांतर्गत कथा असे कथानक गुंफीत डॉ. गवस यांनी वास्तवाचे भान व संवेदनशीलता काय असते याची खरी जाणिव वाचकांना करून दिली आहे. डायऱ्या, पटकथा, ज्योतिबाला लिहलेली पत्रे अशा वेगळया माध्यमांचा वापर कादंबरी या वाङ्.मयप्रकाराला साकारतांना डॉ. गवस यांनी केला त्यामुळे कादंबरी एक वेगळे परीमाण साधते. ज्योतीबांना लिहिलेल्या पत्रांवरून ज्योतीबांचा काळ व आजचा काळ यांच्यातली झालेली मूल्ये

व संस्कृतीची तफावत जाणवते. दिपूशेठ, कोणकेरी व आडव्याप्या ही तीन मुख्य पात्रे या कादंबरीत आहेत. या तीनही पात्रांचा शेतकरी जीवनाशी अतिशय जवळचा संबध आहे. कोणकेरी हा एका कोरडवाहू शेतकऱ्याचा मुलगा आहे. पण काळाच्या ओघात शेतीची झालेली दूरवस्था त्याला शेतीपासून फार दूर घेऊन जाते. देशात सगळयात जास्त भ्रष्टाचार होणाऱ्या महसूल विभागात कोणेकरी नोकरी पत्करतो. संवेदनशील असणारा कोणकेरी पाण्यात राहून माश्याशी वैर केल्याप्रमाणे इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांप्रमाणे भ्रष्टाचार न करता त्यांना कधी कधी विरोध करतो. याची किंमतही त्याला चुकवावी लागते.

उप्पेटबेटगिरी या गावी कोणकेरी नोकरी करतो. हे तालुक्याचे ठिकाण असून येथे तहसिल कार्यालय आहे. कादंबरीतील दुसरे पात्र म्हणजे उप्पेटबेटगिरी या गावात भांडेविक्री करणारा दिपूशेठ हे होय. दिपूशेठचा आपल्या भांडेविक्रीच्या व्यवसायामुळे पंचक्रोशीतील शेतकऱ्यांशी त्यांचा रोजचाच संबध येतो. कादंबरीतील तिसरे पात्र म्हणजे या सृष्टीचा अविभाज्य घटक म्हणजेच शेतकरी असणारा आडव्याप्या हा होय. अशा शेतीशी संबंध येणाऱ्या पात्रांमुळे शेतीचे अर्थकारण नेमके काय आहे; याची जाणीव आपणास होते. शेतकऱ्याच्या वेदनेचे खरे मूळ शोधण्याचा प्रयत्न या कादंबरीतून डॉ. गवस यांनी केंले आहे.

शिक्षणाचा प्रसार झाला शेतकऱ्याची मुले शिकू लागली मोठमोठया अधिकारपदावर स्थानापन्न होऊ लागली. पण तरीही सगळयांना मोठया पदांवर स्थानापन्न होणे काही शक्य नाही. शिक्षण हे साध्य नसून साधन आहे. नोकऱ्यांसाठीच शिक्षण पूर्ण करावं याचं पक्क समीकरण डोक्यात बसलेल्या युवकांनी श्रमसंस्कृतीला तिलांजली दिली. एका अर्थाने शिक्षणाने त्यांचे श्रम काढून घेतले व त्यांना पांगळे, लाचार व बेकार बनवले. कारण ब्रिटीश भारतातून गेल्यावर आपण शिक्षण पध्दतीत कुठलाच बदल घडवला नाही हा वास्तव आक्षेप डॉ. गवस यांचा आहे. स्वत: त्यांनी शिक्षणव्यवस्थेत इतकी वर्ष काम केले असल्याने त्यांना शिक्षणव्यवस्थेतली सगळी वळणे, वाटा, राजकारण, वास्तव व दांभिकता यांची परीपूर्ण जाणीव आहे. शिक्षणाचं माहेरघर असणाऱ्या पुण्यातील पंचतारांकीत विद्यापीठ म्हणून गणल्या जाणाऱ्या पुणे विद्यापीठातील मराठी विभागात प्रपाठक या पदाचा त्यांनी दोन वर्ष कार्यभार सांभाळलेला आहे.

नोकरी म्हणजे पैसा, वातानुकूलीत खोलीत बसून हाताची नोकर चाकर याची अवास्तव अपेक्षा बाळगत शिक्षण केल्यावर एक ना धड भाराभार चिंध्या या म्हणीप्रमाणे शेतकऱ्यांच्या मुलांची अवस्था झाली व होणारच. शिकल्यावर गोठयात शेण भरायचे तर इस्त्रीची कपडे खराब होतील. समाज आपणास शिकूनही नोकरी नाही म्हणून अवहेलना करील याचीही जनलज्जा आज ग्रामीण भागात दिसते. समाज काय म्हणेल हा माणसाच्या जीवनातला फार मोठा अडथळा झाला आहे, गतिरोधक झाला आहे. या युगात हा अडथळा पार करणे अतिशय महत्वाचे आहे त्याशिवाय आपली प्रगती होणार नाही याचीही एक स्पष्टशी जाणीव हया कादंबरीत होते.

समाजाचा स्वार्थीपणा, असंवेदनशील वृत्ती, किडलेली मने, संकुचित आणि आत्मकेंद्रीपणा आपणास वाचनातून जाणवतो. या अशा वृत्तीमुळे व शहरीकरणाच्या वाढत्या समस्यांमुळे कुटुंबपध्दतीला छेद गेला तसेच वेगवेगळी पवित्र असणारी नाती दुभंगली गेली. माणूस माणसापासून दूर गेला त्यांचा एकमेकांचा संवाद मंदावलाय. मनाचा ताण व दडपण काळाच्या ओघात त्रासदायक ठरू लागले.

झिंगारू दारूवाला, पैलवानछाप बुलगाणीवाला, गोऱ्या कातडीची बाई, कांताराम वडवट्टीकर, निवृत्त ग्रामसेवक व धनगरवाडयावरचा म्हातारा ही पात्रेसुध्दा या कादंबरीत महत्वाची भूमिका बजावतात. या पात्रांमुळेच कादंबरीत एक मोठी गुंतागुंत होतांना आपणास दिसते. दिपूशेठ, कोणकेरी, व आडव्याप्या हे तीघेही हा सगळा गुंता सोडविण्याचा प्रयत्न करत असतात व त्यातच अधिक ते गुरफटूनही जातात. कादंबरीतील गुंतागुंत वाचकांच्या पण मनात गुंता निर्माण करते. वाचकही कादंबरीत इतका गुरफटतो की कादंबरी संपल्यावरच तो हया साऱ्या गुंत्यातून बाहेर येतो. आपल्याला जीवन जगत असतांना जो शुष्क कोरडेपणा आजच्या हया स्थितीत जाणवतोय तो जसाच्या तसा हया कादंबरीत जाणवतो. नाती-गोती, स्नेह-संबंध, सगेसोयरे, मित्र यापैकी कुणीही आजच्या जगात कुणाचं नाही. पैसा हीच गोष्ट खूपच महत्वाची आहे. सगळयांनी पैशाच्या मागे धावायचं, आणि पैसा हेच एक तत्व या नागरीकरणाच्या युगात जपायचं. या पैशामुळे मानवी नात्यात निर्माण झालेले हे कोरडेपण माणसाला उ ध्वस्त करते आहे. घामाची राख होते आहे कारण सारे राज्य हे चोरांचे आहे.

कोणकेरी ज्या ऑफीसात काम करतो तिथे सगळा पैशाचा बाजार आहे. जो आज महाराष्ट्राच्या सर्व तहसिल कार्यालयांमध्ये चालू आहे. या गोष्टीची जाणीव महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्याला तसेच शेतकऱ्याच्या मुलाला आहे. महसूल खाते म्हणजे दुभती गाय होय. पैशासाठी माणूस कुणाचाही बळी घेऊ शकतो याची जाणीव कोणकेरी करून देतो. सत्याला अनुसरून जीवन जगणाऱ्या माणसाला जीवन जगता येत नाही त्याचं हे भ्रष्टाचारी लोक जीणं हराम करून टाकतात. भ्रष्ट दुनियेत स्वतःलाही भ्रष्ट व्हावे लागते नाहीतर त्याची मोठी किंमत चुकवावी लागते. कोणकेरीच्या कार्यालयात त्याला असेच वाईट अनुभव येतात व त्याचे जीवन असहाय्य होऊन जाते. कोणकेरीच्या नोकरीच्या ठीकाणी आलेल्या हया सर्व अनुभवांची माहिती तो गायब झाल्यावर दिपूशेठला कळते. दिपूशेठला कोणकेरीच्या मैत्रीमुळे बऱ्याच वाईट अनुभवांना सामोरे जावे लागते. कुठून या लफडयात पडलो असे उद्‌गार दिपूशेठच्या बोलण्यातून बहुतांश वेळा जाणवतात.

गांधीजीनी खेडयाकडे चला सांगितले. पूर्वी खेडी ही स्वयंपूर्ण होती पण आज खेडयांची अवस्था अतिशय दयनिय झालेली आहे. बदललेल्या खेडयांचे विदारक, दाहक व वास्तव चित्रण ब-बळीचा मध्ये येते. महाराष्ट्रात ८० टक्के शेतकरी हे सर्वसामान्य आहेत. त्यांना या भ्रष्टाचाराच्या युगात कागदपत्रे, खरेदीखते, नोदी वा तत्सम कामासाठी पैसे द्यावे लागतातच. कोणकेरीचे मन संवेदनशील असल्याने त्याच्या मनाला या सर्व घटना बघून वेदना होतात. या सर्व

गोष्टींना भ्रष्ट राजकारणच जबाबदार आहे याची जाणीव वाचकाच्या मनात आल्याशिवाय राहत नाही. आडव्याप्याला सूडबुध्दीने सोसायटीमध्ये मिळणारी वागणूक ही भीषण आहे. खेडयातले राजकारण कसे बेरके झाले आहे ते आपणास दिसते. प्रत्यक्षात कोणत्याही सोसायटीत आजही आपण घेतलेले कर्ज फक्त उलट पालट केले जाते. हा अनुभव मलाही आहे कारण मीसुध्दा स्वत: एका सहकारी सोसायटीचा कर्जदार सभासद आहे.

सावकारांची कर्ज शेतकऱ्याला आपल्या आयुष्यातून उठवतात. चक्रव्याढ व्याज जमिनीचा कब्जा म्हणजेच एक प्रकारे शेतकऱ्याच्या नरडीचा घोटच घेतला जातो. हे वास्तव सत्य डॉ. गवस यांनी मांडले आहे. एकूणच ब-बळीचा या कादंबरीत ग्रामीण संवेदनांचा ठेवा आहे. ग्रामीण जीवनातील सुख-दुखे, चढउतार, स्थितीगती याबाबतची लेखकाची संवेदना प्रकट झाली आहे. शेती, शेतातली औजारे, बियाणे, सहकार, नांगर, बैल, ग्रामीणता, ग्रामीण बोली, समस्या, दुष्काळ, कर्ज, राजकारण असे अनेक संदर्भ या कादंबरीत येतात.

खेडयातील अमूलाग्र बदलामुळे जागतिकीकरणाचे नवे वारे ग्रामीण भागात वाहू लागले व शहरीकरणाचे सर्व लोकांना वेध लागलेत पण त्यांच्या दुष्परीणामांशी कुणाला काही घेणे-देणे नाही. त्यामुळेच पारंपरिक संस्कृतीला छेद देत खेडेगावातही विकृती निर्माण होऊ लागली आहे याची सुस्पष्ट जाणीव डॉ.गवस यांनी करून दिली आहे. जागतिकीकरण, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक, औद्योगिक आणि शहरीकरणाचा ग्रामीण संस्कृतीवर काम परीणाम झाला याचाही भलामोठा आलेख ब-बळीचा या कादंबरीत आला आहे. आशयाची परिणामकारकता वाढवण्याचे जबरदस्त सामर्थ्य डॉ. गवस यांच्यात असल्याने वाचकांच्या मनाचा ठाव ही कादंबरी घेते. आशयाची उत्कंठा वाढवण्यासाठी वापरलेली बोलीभाषा व या बोलीभाषेतील गावराण व शिवराळपणा फारच मोठा परीणाम साधतो व ग्रामीण वास्तवाचं भान निर्माण करतो.

**संदर्भ :-**

**१) राजन गवस - युनिक फिचर्स (**uniquefeatures.in/category)

**२) ब-बळीचा - राजन गवस, पॉप्युलर प्रकाशन - पुणे.**